## कोतवाल पदभरती जाहिरात-2023 ता.परतूर जि.जालना

### जाहिरात क्रमांक-2023/मशाका/आस्थापना/कोतवाल भरती-2023/कावी – 230, दि.04/08/2023

महाराष्ट्र महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.केओटी-2012/प्र.क्र.432/ई-10 दिनांक.05 सप्टेंबर, 2013 व शासन निर्णय क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.17/ई-10, दि.17, मे 2023 अन्वये तहसील कार्यालय, परतूर यांचे आस्थापनेवरील अवर्गीकृत कोतवाल संवर्गामधील रिक्त पदांच्या पदभरतीसाठी खालीलप्रमाणे प्रवर्ग निहाय उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

कोतवाल संवर्गातील रिक्त पदांचे आरक्षण, कोतवाल संवर्गातील रिक्त पदे एकुण पद संख्या-13, ( कोतवाल पदाचे मासिक एकत्रित मानधन 15,000/-रुपये )

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | महिला | समांतर आरक्षणाशिवाय भरावयाची पदे | एकुण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| 01. | अनूसुचीत जाती | 01 | 01 | 02 |
| 02. | अनूसुचीत जमाती | 00 | 00 | 00 |
| 03. | विमुक्त जाती (अ) | 00 | 01 | 01 |
| 04. | भटक्या जमाती (ब) | 00 | 00 | 00 |
| 05. | भटक्या जमाती (क) | 00 | 00 | 00 |
| 06. | भटक्या जमाती (ड) | 00 | 01 | 01 |
| 07 | विशेष मागास प्रवर्ग | 00 | 00 | 00 |
| 08. | इतर मागास वर्ग | 00 | 01 | 01 |
| 09. | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | 01 | 01 | 02 |
| 10. | अराखीव | 02 | 04 | 06 |
| | एकुण | 04 | 09 | 13 |

टिप :- 01. प्रस्तुत जाहिरातीमध्ये संक्षीप्त तपशील दिलेला आहे. सदर पद भरतीच्या अनुषंगाने कोतवाल या पदासाठी सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय रिक्त पदांचा तपशील, सविस्तर टिपा, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, इतर अटी व शर्ती, परीक्षेसाठी शुल्क फी, परीक्षा पध्दती, सर्वसाधारण सुचना, अर्ज करण्यासंबंधीच्या सुचना इ. आवश्यक माहिती, सविस्तर जाहिरात तहसील कार्यालय, परतूर येथील नोटीस बोर्डावर, जालना जिल्हयाच्या www.jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

02. सदरील जाहिराती बाबतचे जाहीर प्रगटन सर्व तलाठी सजे, ग्रामपंचायती, ग्रामपंचायत अंतग्रत गावे, पंचायत समिती तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यता आलेली आहे.

03. प्रस्तुत पदभरतीसाठी अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने जाहिरात व जाहिरातीमधील सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण व सुचना काळजीपुर्वक वाचून त्यांना लागू होणा-या बाबी विचारात घेऊनच अर्ज करावा.

04. प्रस्तुत प्रक्रियेत अर्ज समक्ष स्विकारले जाणार आहे. अर्ज पोस्टाद्वारे स्विकारले जाणार नाही.

05. प्रस्तुत प्रकीयेसाठी महत्वाच्या तारखा / वेळापत्रक खालीलप्रमाणे

| बाब | पासून | पर्यंत |
|---|---|---|
| अर्ज करण्याचा कालावधी | दिनांक 08/08/2023 | दिनांक.22.08.2023 |
| राष्टीयकृत बँकेत डी.डी.भरण्याचा दिनांक | दिनांक 08/08/2023 | दिनांक.22.08.2023 |
| लेखी परीक्षा दिनांक | दिनांक.10/09/2023 (रविवार रोजी) | |
| कोतवाल वयोमर्यादा | किमान 18 व कमाल 40 | |
| शैक्षणिक पात्रता | उमेदवार किमान चौथी पास असावा | |

दिनांक :- 04/08/2023
स्थळ :- परतूर

सदस्य सचिव
तालुका निवड समिती तथा
तहसीलदा,परतूर

अध्यक्ष
तालुका निवड समिती तथा
उपविभागीय अधिकारी,परतूर



Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
# तहसिल कार्यालय,परतूर
प्रशासकीय इमारत, सर्वे नंबर 242/9, परतूर ता.परतूर जि.जालना
महाराष्ट्र शासन
☎ : 02484 - 221028
Email :- Tahasildarpartur@gmail.com

जा.क्र.2023/महसुल/आस्थापना/कोतवाल भरती-2023/कावी- 230 दिनांक.04.08.2023

## -:: जाहिरात ::-

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.के.ओटी - 2012/प्र.क्र.433/ई-10, दिनांक.05 सप्टेंबर,2023 व शासन निर्णय क्र.संकीर्ण-2023/प्र.क्र.17/ई-10, दिनांक.17 मे, 2023 नुसार कोतवाल भरतीसाठी सुधारित नियम मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. तसेच मा.जिल्हाधिकारी,जालना यांचेकडील पत्र जा.क्र. 2023/ मशाका-1/आस्था-2/कोतवाल भरती/कावी दिनांक.18.05.2023 मध्ये नमुद नुसार शासन पत्र जा.क्र.संकीर्ण - 2023/ प्र.क्र.17/ई-10 दिनांक.17.07.2023 अन्वये कोतवाल संवर्गातील रिक्त असलेल्या पदांच्या 80 टक्के मर्यादेत पदे भरण्यासाठी एक विशेष बाब म्हणून शासनाने मान्यता दिलेली आहे आणि प्र.सहाय्यक आयुक्त (मावक), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.2023/मावक/कक्ष-2/सिआ-231/सिआर-231/कावी- दिनांक.21.07.2023 प्रमाणे विहित करण्यात आलेल्या आरक्षणानुसार तहसीलदार, परतूर यांच्या आस्थापनेवरील अवर्गीकृत कोतवाल संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

कोतवाल संवर्गातील रिक्त पदांचे आरक्षण, कोतवाल संवर्गातील रिक्त पदे एकूण पद संख्या-13, ( कोतवाल पदाचे मासिक एकत्रित मानधन 15,000/-रुपये )

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | महिला | समांतर आरक्षणाशिवाय भरावयाची पदे | एकुण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| 01. | अनूसुचीत जाती | 01 | 01 | 02 |
| 02. | अनूसुचीत जमाती | 00 | 00 | 00 |
| 03. | विमुक्त जाती (अ) | 00 | 01 | 01 |
| 04. | भटक्या जमाती (ब) | 00 | 00 | 00 |
| 05. | भटक्या जमाती (क) | 00 | 00 | 00 |
| 06. | भटक्या जमाती (ड) | 00 | 01 | 01 |
| 07 | विशेष मागास प्रवर्ग | 00 | 00 | 00 |
| 08. | इतर मागास वर्ग | 00 | 01 | 01 |
| 09. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | 01 | 01 | 02 |
| 10. | अराखीव | 02 | 04 | 06 |
| | एकुण | 04 | 09 | 13 |

**( I ) सुचना :-**

01. सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत (कमी/जास्त) बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगीत झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.
02. महिलांसाठी आरक्षीत पदावर महिला उमेदवार न मिळाल्यास महिला व बाल विकास विभागाचा शासन निर्णय दिनांक.25.05.2021 अन्वये त्या-त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून सदर पदे भरण्यात येतील.

**( II ) शैक्षणिक पात्रता :-**

01. उमेदवार किमान चौथी उत्तीर्ण (पास) असावा.
02. उमेदवारास मराठी भाषा लिहिता व वाचता येणे आवश्यक आहे.

**( III ) वयोमर्यादा :-**

01. कोतवाल पदासाठी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच (दि.22.08.2023 रोजी) किमान वय 18 व कमाल वय 40 वर्षापेक्षा जास्त नसावे. वयाचा पुरावा/शाळा सोडल्याचा दाखला (टि.सी.) / प्रवेश निर्गम उतारा इ. सांक्षाकीत प्रती जोडाव्यात.

**( IV ) इतर अटी / शर्ती व सामाजिक आरक्षण :-**

01. अर्जदार शारिरीकदृष्टया सुदृढ असावा तसेच हा परतूर तालुक्यातीलच रहिवासी असावा व तहसीलदार/नायब तहसीलदार यांनी निर्गमित केलेले रहिवासी प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.
02. कोतवाल हे पद वर्ग चार संवर्गात मोडत नाही व सदरील पद हे अवर्गीकृत असल्यामुळे अपंग, प्रकल्प/भुकंपग्रस्त, अंशकालीन, खेळाडू, माजी सैनिक इत्यादीसाठी देण्यात आलेली वयोमर्यादा, शिथीलता व आरक्षण कोतवाल भरतीसाठी असणार नाही.
03. मागसवर्गीय उमेदवारांनी उपजिल्हाधिकारी दर्जाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील व जात वैधता प्रमाणपत्र नियुक्तीनंतर सहा महिन्यात सादर करणे आवश्यक राहील. मागासवर्गीय उमेदवारांनी त्या-त्या प्रवर्गाचे मुळ जात प्रमाणपत्र तपासणीचे वेळी


Scanned with CamScanner

सादर करणे बंधनकारक राहील. तसेच शासन निर्णय शासन निर्णय क्र.बीसीसी 2011/प्र.क्र.1064/2011/16ब दिनांक.12/12/2011 अन्वये संबंधीत उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहून, जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर बंधपत्र/शपथपत्र लिहून दिल्यानंतर विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

04. मागासवर्ग प्रवर्गातील इतर मागासवर्ग, वि.ज. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटात मोडत नसलेल्या महिला सदस्यांना महिलांच्या 30 टक्के आरक्षणासाठी क्रिमिलेअर मध्ये मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकारी यांचे दिनांक.31/03/2024 या दिनांकापर्यंत वैध असलेले नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

05. महिला समांतर आरक्षणातर्गत अर्ज करणा-या उमेदवारांकरीता शासन निर्णय क्र.महिला 2023/प्र.क्र.123 कार्या-2 अन्वयेच्या दि.04/05/2023 रोजीच्या शासन निर्देशानुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षीत असलेल्या पदावरील निवडीकरीता गुणवत्तेच्या अधारावर पात्र ठरणा-या महिला उमेदवारांना नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून सदर शासन निर्देशातील मुद्दा क्र.04 नुसार अनूसुचीत जाती व अनूसुचीत जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षीत असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

06. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील उमेदवारांकरीता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो 4019/प्र.क्र.31/16-अ दिनांक 12.02.2019 व दिनांक.31.05.2021 अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

07. कोतवाल म्हणून नेमणूक झाली तर त्यांना नेमून दिलेल्या गावात राहून काम करेल असे रु.100/- चे बॉंड वर हमीपत्र दयावे. तसेच कोतवाल म्हणून नियुक्ती झाल्यापासून परत रु.100/- चे बंधपत्रावर तारण म्हणून परिच्छेद 4 च्या (फ) नमुन्यात दोन जामीन दयावे लागतील.

08. निवड झालेल्या उमेदवारांना शारीरिक क्षमतेबाबतचे वैदयकीय प्रमाणपत्र सादर करावे लागेल व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

09. कोतवाल या पदावर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असेल.

10. कोतवाल हा पुर्णवेळ गावकामगार असले. कोतवाल हे पद गट क व ड संवर्गातील नसून ते अवर्गीकृत पद (Non Classified) आहे. त्यामुळे सदर पदास सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळणार नाही.

11. महसूल व वन विभागाचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-2022/प्र.क्र.191/ई-10, दिनांक 06 एप्रिल, 2023 मध्ये नमूद केल्यानुसार कोतवालास प्रतीमाह रु.15,000/- एवढे मानधन राहील.

( V ) परीक्षा शुल्क (फी) :-

01. प्रस्तुत भरती प्रक्रियेसाठी खालील प्रमाणे परीक्षा शुल्क राहील.

02. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकीरता रु.500/-

03. मागासवर्गीय उमेदवारांकरीता रु.400/-

04. वरीलप्रमाणे परीक्षा शुल्क **"तहसीलदार, परतूर तथा सदस्य सचिव, कोतवाल निवड समिती"** या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचे डी.डी. (डिमांड ड्राफ्ट) (Payble at Jalna) अर्जासोबत सादर करावा व सदर डी.डी.च्या मागील बाजूस उमेदवाराने स्वत:चे नाव, पत्ता व अर्जात दावा केलेला प्रवर्ग लेखी नमूद करावा. सदर परीक्षेचे शुल्क केवळ डी.डी.द्वारेच स्विकारले जाईल इतर कोणत्याही माध्यमातून शुल्क स्विकारले जाणारे नाही. ( परीक्षा शुल्क बँक प्रोसेसींग चार्जेस तसेच त्यावरील देय कर वगळून राहील )

05. वरीलप्रमाणे परीक्षा शुल्क हे ना-परतावा (Non-Refundable) राहील.

( VI ) परीक्षा व निवड पध्दती :-

01. कोतवाल पदासाठी लेखी परीक्षा रविवार दिनांक.10.09.2023 रोजी परतूर शहरातील विविध परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. याबाबत उमेदवारांना प्रवेशपत्राद्वारे कळविण्यात येईल.

02. लेखी परीक्षा ही एकुण 50 प्रश्न (100 गुणांची) असलेली वस्तूनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. लेखी परीक्षेत सामान्य ज्ञान, अंकगणित, मराठी भाषा विषय व जिल्हयाची सर्वसाधारण माहिती या विषयावरील प्रश्न असतील.

03. गुणवत्ता क्रम हा लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या अधारे म्हणजेच एकुण 100 गुणांपैकी मिळालेल्या गुणांच्या आधारावर राहील.

04. लेखी परीक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्ता धारण करणा-या पात्र उमेदवारांची तात्पुरती निवड यादी दिनांक.18/09/2023 रोजी तहसील कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच जालना जिल्हयाच्या अधिकृत संकेतस्थळावर (http://www.jalna.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल.

05. लेखी परीक्षेमधील प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार तात्पुरती अंतिम निवड यादी दिनांक.21.09.2023 पर्यंत तहसील कार्यालयाचे नोटीस बोर्डावर तसेच जालना जिल्हयाच्या अधिकृत संकेतस्थळावर (http://www.jalna. nic.in) प्रसिध्द करण्यात येईल.

06. उमेदवारांस समसमान गुण मिळाल्यास गुणवत्ता क्रम हा दिनांक.27.06.2008 चे शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

07. सत्यता पडताळणीमध्ये अर्जात नमूद केलेल्या बाबींचे प्रमाणपत्र/अभिलेखे/कागदपत्रे सादर करण्यास उमेदवार असमर्थ ठरल्यास त्यास भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल व पुढील गुणानुक्रम असणा-या उमेदवारांस संधी देण्यात येईल.

08. निवड करण्यात आलेल्या उमेदवार निवड झाल्यापासून 15 दिवसाच्या आत रुजु न झाल्यास प्रतिक्षाधीन यादी मधील दुसरे उमेदवार यांची नियुक्ती करण्यात येईल.

( VII ) A अर्ज कसा करावा :-

01. सदर पदासाठी करावायाचा अर्जाची प्रत तहसील कार्यालय, परतूर येथे रु.50/- शुल्क भरुन उपलब्ध होईल.

02. तहसील कार्यालय, परतूर कडून प्राप्त करुन घेतलेला विहित नमून्यातील अर्ज त्यामधील माहिती/ तपशील सुस्पष्टपणे व ठळकपणे नमूद करुन सादर करावा.

03. शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती अर्जासोबत जोडाव्यात.

04. जातीचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी तसेच उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमी लेअर) चे तत्व अनु.जाती / जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गाला लागू असल्याने उन्नत / प्रगत गटात मोडत नसल्याचे सन 2023-2024 या वर्षातील तसेच अर्जाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत निर्गमित झालेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी.



Scanned with CamScanner

05. उमेदवाराने संपूर्ण भरलेला विहित नमून्यातील अर्ज, शैक्षणिक पात्रता, जातीचे प्रमाणपत्र इ.सर्व आवश्यक कागपत्रासह **तहसीलदार तथा सदस्य सचिव, तालुका निवड समिती, तहसील कार्यालय, परतूर यांचे कार्यालयात** दिनांक.22.08.2023 पर्यत कार्यालयीन वेळेत (सायंकाळी 06:15 वाजेपर्यंत) (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) सादर करावेत. टपालाने किंवा इतर मार्गाने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच या संबंधाने उमेदवारासमवेत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

06. अर्जाच्या पाकीटावर कोतवाल पदासाठी अर्ज व सामाजिक (मागासवर्ग) आरक्षणानुसार प्रवर्ग नमूद करावा.

07. अर्जदाराने स्वत:चा पत्ता असलेला व त्यावर **रु.5/-** चे टपालाचे तिकीट लावून सदर लिफाफा अर्जासोबत देणे बंधनकारक राहील. ज्यामुळेन अर्जदार यांना लेखी परीक्षेसाठी प्रवेशपत्र टपालाद्वारे पाठविण्यात येईल. टपालाद्वारे प्रवेशपत्र प्राप्त न झाल्यास संबंधीत तहसील कार्यालयामधून उमेदवारास त्यांचे प्रवेशपत्र दिनांक.08.09.2023 व दिनांक.09.09.2023 रोजी पर्यत स्वत:चे ओळखीचा पुरावा दाखवून हस्तगत करता येईल.

08. सर्व प्राप्त अर्जाची छाननी केल्यानंतर लेखी परिक्षेसाठी पात्र / अपात्र उमेदवारांची यादी दिनांक.25/08/2023 रोजी तहसील कार्यालयाचे नोटीस बोर्डावर डकविण्यात येईल व जालना जिल्हयाचे संकेतस्थळावर (http://www .jalna.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल.

09. लेखी परिक्षा ही दिनांक.10/09/2023 रोजी नियोजीत आहे. सदर लेखी परीक्षेची उत्तर तालिका त्याच दिवशी सायंकाळी 05.00 वा. तहसील कार्यालयाचे नोटीस बोर्डवर तसेच जालना जिल्हयाचे अधिकृत संकेत स्थळावर (http://www.jalna.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल.

**(VII) B उमेदवाराने अर्ज सादर करतांना अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती सादर कराव्यात. तसेच गुणानुक्रमे लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणी वेळी खालीलप्रमाणे दस्तऐवजाच्या मुळ प्रती सादर करावे लागतील.**

01. शैक्षणिक अर्हतेचे मुळ प्रमाणपत्र
02. वयासंबंधी दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (टि.सी.) / शाळेचा प्रवेश निर्गम उतारा)
03. जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र
04. तहसीलदार / नायब तहसीलदार यांनी निर्गमित केलेले रहिवासी प्रमाणपत्र
05. नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (अर्जाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत निर्गमित झालेले)

**(VIII) कोतवाल भरतीचा कालबध्द :-**

| अ.क्र. | बाब | कालावधी | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 01. | अर्ज दाखल करणे | दि.08/08/2023 ते 22.08/2023 (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) | कार्यालयीन वेळत | तहसील कार्यालय, परतूर |
| 02. | लेखी परीक्षेसाठी पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि.25./08/2023 | कार्यालयीन वेळत | 01. उपविभागीय अधिकारी कार्यालय, परतूर<br>02. तहसील कार्यालय, परतूर<br>03. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेत स्थळावर http://www.jalna.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. |
| 03. | ज्यांना प्रवेशपत्र पोष्टाने प्राप्त झाले नाहीत अशा उमेदवारांना तहसील कार्यालयातून प्रवेशपत्र देणे | दि08/09/2023 ते दि.09/09/2023 (सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) | कार्यालयीन वेळेत | |
| 04. | लेखी परीक्षा | दि.10/09/2023 | सकाळी 11 ते 12:30 | परीक्षेचे ठिकाण प्रवेश पत्राद्वारे यथावकाश कळविण्यात येईल. |
| 05. | प्राथमिक उत्तरतालिका प्रसिध्द करणे | दि.12/09/2023 | सायंकाळी 05:00 वाजता | 01. उपविभागीय अधिकारी कार्यालय, परतूर<br>02. तहसील कार्यालय, परतूर<br>03. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेत स्थळावर http://www.jalna.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. |
| 06. | प्राथमिक उत्तरतालिका प्रसिध्द झाल्यानंतर त्यावर काही आक्षेप/हरकती असल्यास त्या सादर करणे | दि.13.09/2023 ते दि.14/09/2023 | कार्यालयीन वेळेत | तहसील कार्यालय, परतूर |



Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 07. | अंतिम उत्तरतालिका प्रसिध्द करणे | दि.15.09.2023 | कार्यालयीन वेळेत | 01. उपविभागीय अधिकारी कार्यालय, परतूर<br>02. तहसील कार्यालय, परतूर<br>03. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेत स्थळावर http://www.jalna.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. |
| 08. | लेखी परीक्षेतील गुणवत्ता क्र.नुसार पात्र उमेदवारांची अटी व शर्तीच्या अधीन राहून तात्पुरती यदी प्रसिध्द करणे | दि.18/09/2023 | कार्यालयीन वेळेत | 01. उपविभागीय अधिकारी कार्यालय, परतूर<br>02. तहसील कार्यालय, परतूर<br>03. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेत स्थळावर http://www.jalna.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. |
| 09. | मुळ कागदपत्रांची पडताळणी | दि.20/09/2023 व दि.21/09/2023 | कार्यालयीन वेळेत | उपविभागीय अधिकारी कार्यालय, परतूर |
| 10. | अंतीम निवड यादी प्रसिध्द करणे | दि.21/09/2023 | कार्यालयीन वेळेत | 01. उपविभागीय अधिकारी कार्यालय, परतूर<br>02. तहसील कार्यालय, परतूर<br>03. जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकृत संकेत स्थळावर http://www.jalna.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. |

( IX ) **सर्वसाधारण सुचना:-**

01. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे समजता येणार नाही.
02. उमेदवारास लेखी परिक्षेसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल.
03. एखादया उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल
04. विहित नमुन्यात नसलेले अर्ज एकाच वेळी एकापेक्षा जास्त प्रवर्गासाठी दावा केलेले अर्ज, विहित ठिकाणी स्वाक्षरी नसलेले अर्ज, परतूर तालुक्यातील रहिवासी नसलेल्या उमेदवाराचे अर्ज, विहित परीक्षा शुल्काचे डी.डी. न जोडलेले अर्ज, विहित पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज, अपुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, फोटो नसलेले व फोटो स्वसाक्षांकीत न केलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत न जोडलेले अर्ज, विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज, विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाहीत.
05. या जाहीरातीला अनुसरुन ज्या उमेदवाराचे अर्ज विहित कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. ज्या उमेदवारांनी या जाहिरातीपूर्वी तहसील कार्यालय, परतूर किंवा उपविभागीय अधिकारी कार्यालय, परतूर किंवा जिल्हाधिकारी कार्यालय, परतूर येथे कोतवाल पदासाठीच्या नोकरीसाठी अर्ज सादर केलेले आहेत त्या अर्जदाराचे अर्जाचा विचार केला जाणार नाही. त्यानी नव्याने विहित नमुन्यात विहित मुदतीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
06. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, जातीचा दाखला व इतर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. कोणतेही मूळ कागदपत्र अर्जासोबत दाखल करु नयेत. उमेदवाराने त्याची आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी सादर करणे उमेदवारावर बंधनकारक राहील.
07. कोतवाल भरतीचे विहित नमुन्यातील परीपुर्ण अर्ज विहित मुदतीत तहसील कार्यालय, परतूर स्वीकृत केले जातील याची नोंद घ्यावी.
08. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, सामाजिक आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, सेवा प्रक्रियेत बदल करणे, भरती प्रक्रियेसंदर्भात उद्‌भवणारे वाद, अन्य कोणतीही तांत्रिक /प्रशासकीय अडचण / तक्रारी याबाबतचे **सर्व अधिकार तालुका निवड समिती, परतूर** स्वतःकडे राखून ठेवीत आहे. उक्त कोणत्याही बाबींवर सदर समितीचा निर्णय अंतिम राहील.
09. सदरील जाहिराती बाबतचे जाहीर प्रगटन सर्व तलाठी सज्जे, ग्रामपंचायती, ग्रामपंचायत अंतर्गत गावे, मंडळ कार्यालये, पंचायत समिती, तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच जालना जिल्हयाच्या (http://www.jalna.nic.in) या अधिकृत संकेतस्थळावरही उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

**दिनांक :- 04/08/2023**
**स्थळ :- परतूर**

**सदस्य सचिव**
**तालुका निवड समिती तथा**
**तहसीलदा,परतूर**

**अध्यक्ष**
**तालुका निवड समिती तथा**
**उपविभागीय अधिकारी,परतूर**



Scanned with CamScanner